माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.१३१७०/२१/अ.क्र.५१२४/२५/०१

**श्री. राकेश भुवनेश्वर शुक्ला**
रुम नं. ०३, रंजन धुमाले चाळ, संत कवीर मार्ग
कोकणी पाडा, दहिसर (पूर्व), मुंबई – ४०००६८.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) आर/उत्तर विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त आर/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
९२१/७, दहिसर गाव, रुस्तमजी कॉलनी, रंगनाथ केसकर मार्ग, दहिसर (प.) मुंबई - ४०००६८.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता आर/उत्तर विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त आर/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
९२१/७, दहिसर गाव, रुस्तमजी कॉलनी, रंगनाथ केसकर मार्ग, दहिसर (प.) मुंबई - ४०००६८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १७.०९.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

आज सुनावणीच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) आर/उत्तर विभाग, श्री. अभिजीत कांबळे व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता आर/उत्तर विभाग, श्री. नयनीश वेंगुर्लेकर उपस्थित आहेत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना लेखी निवेदनाद्वारे असे कळविण्यात आले की, जोडपत्र-अ मूळ माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झाली असून माझे समाधान झाले आहे.

आज सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) आर/उत्तर विभाग, श्री. अभिजीत कांबळे यांनी अपीलार्थी यांना माहिती दिल्याचा एक संच आयोगास सादर केला आहे. सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २ (च) नुसार उपलब्ध असलेली माहिती यापूर्वीच अपिलार्थीस प्रदान करण्यात आलेली असल्यामुळे प्रस्तूत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भो. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १७.०९.२०२५**